खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### प्रशिक्षण व रोजगार मेळावा



# रोजगारासाठी कौशल्याभिमुख शिक्षणाची गरज : देवेंद्र बुट्टेपाटील

## राजगुरू महाविद्यालयात प्रशिक्षण व रोजगार उपक्रम

**राजगुरुनगर, (वार्ताहर):** पारंपरिक शिक्षणाचा आधार घेताना विद्यार्थ्यांनी रोजगाराचा विचार करून कौशल्याभिमुख शिक्षणाचा अवलंब करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जगदंब प्रतिष्ठान, ट्रू स्किल इन्फोटेक व अनुदीप फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित प्रशिक्षण व रोजगार उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

या वेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, गणेश भुजबळ, आशिष भोसले, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे यांसह विद्यार्थी उपस्थित होते. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी खासदार डॉ. अमोल कोल्हे करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांचे कौतुक केले. ट्रू स्किल इन्फोटेकचे संचालक गणेश भुजबळ यांनी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या संकल्पनेनुसार विद्यार्थ्यांमध्ये रोजगार निर्मिती व्हावी यासाठी या उपक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होईल अशा शिक्षणाची आवश्यकता असून रोजगार निर्मितीसाठी आवश्यक कौशल्याभिमुख शिक्षण या उपक्रमातून विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

कम्युनिकेटीव्ह इंग्लिश अँड डिजिटल लिटरसी या ४५ दिवस चालणाऱ्या अभ्यासक्रमाचे आयोजन महाविद्यालयात विनामूल्य केले जाणार असून पदवीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ यांनी तर आभार डॉ. संजय शिंदे यांनी मानले.

पुढारी

# कौशल्याभिमुख शिक्षणाची गरज : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

**राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा**

पारंपरिक शिक्षणाचा आधार घेताना विद्यार्थ्यांनी रोजगाराचा विचार करून कौशल्याभिमुख शिक्षणाचा अवलंब करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जगदंब प्रतिष्ठान, ट्रू स्किल इन्फोटेक व अनुदीप फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रशिक्षण व रोजगार उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

या वेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, गणेश भुजबळ, आशिष भोसले, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ट्रू स्किल इन्फोटेकचे संचालक गणेश भुजबळ यांनी विद्यार्थ्यांमध्ये रोजगार निर्मिती व्हावी यासाठी या उपक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होईल, अशा शिक्षणाची आवश्यकता असून, रोजगार निर्मितीसाठी आवश्यक कौशल्याभिमुख शिक्षण या उपक्रमातून विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. कम्युनिकेटिव्ह इंग्लिश अँड डिजिटल लिटरसी या ४५ दिवस चालणाऱ्या अभ्यासक्रमाचे आयोजन महाविद्यालयात विनामूल्य केले जाणार असून, पदवीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ यांनी, तर आभार डॉ. संजय शिंदे यांनी मानले.

My Gramin Edition
Oct 7, 2022 Page No. 10
newspaper.pudhari.co.in

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**